भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७०२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/१०/२०१७

**१) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/१०/२०१७ चे ०९.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही शेतात गवत कापीत असतांनी आरोपीने फिर्यादीचे पाठीमागे येवुन पकडले व तिचा विनयभंग केला व जातांनी कोणालाही सांगु नको नाही तर बदनामी होईल असे बोलुन निघुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३५४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**२) वॉटस्अपवर अश्लिल मॅसेज महिलेंचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक १५/०९/२०१७ चे १३.१३ वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे आरोग्य विभागात एकाच आरोग्य केन्द्र विरसी येथे नौकरीला असुन फिर्यादी व आरोपी यांनी सेंदुरवाफा येथे आरोग्य सत्र/लसीकरण सत्र आटोपुन आपआपले घरी गेले लगेच आरोपीने मोबाईल क्र. वरून दुसऱ्या मोबाईने क्र. ने वॉटस्अप वर अश्लिल मॅसेज केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४ (ड)(२) भांदवि. सहकलम ६७ माहीती तंत्रज्ञान अधीनीयम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पिपरेवार पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने धक्का बुक्की केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ११/१०/२०१७ चे १५.४० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सुनील राजारामजी लांजेवर बाजार निरीक्षक नगर परीषद तुमसर हे नगर परीषद तुमसर येथील कर्मचारी असुन आपले ऑफीसमध्ये काम करीत असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन 'तु गणेश उत्सव मुर्ती विक्री दुकानाचे पैसे आम्हाला दिले नाही' असे बोलुन शिवीगाळ करुन फिर्यादीचे कॉल्लर पकडुन धक्का बुक्की केले व शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३५३,३२३,५०४,१८६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**४) फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २८/०९/२०१७ चे १७.१० वाजता दरम्यान यातील आरोपी मोबाईल धारक याने फिर्यादीस फोन वरुन सॅमसंग कंपनीचा टि ७ मोबाईल किंमती १६,९००/–रु. चा हा ४,२००/–रु. मध्ये मिळत असुन तो मोबाईल पोस्ट ऑफीसमध्ये पैसे भरुन घेवुन जा! असे म्हणुन फिर्यादीचे भावाने पैसे भरुन पार्सल घेतले असता त्यात यंत्र असुन मोबाईल नसल्याने फिर्यादीची ४,२००/–रु. ची फसवणुक केल्याने फिर्यादी श्रीकांत वसंता गोमासे वय २७ वर्ष, रा. खरबी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**५) काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १०/१०/२०१७ चे २२.३० ते २३.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी भारत उदाराम यादव वय ४५ वर्ष, रा. सिधीकेंट टोग डोंगरी बु. आरोपीचे घरी रात्री बोलविण्यास गेल्याने आरोपीने शिवीगाळ करुन त्याचे डोक्यावर, हातावर, पायावर, लाकडी काठीने मारुन जखमी केल्याने जखमीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२६,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**६) महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०३/१०/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने आरोपी पतीला घराचे छताचे जाळे काढण्यास बोलावले असता त्यांने अंगणातील बैल बांधण्याचा खुंट उपडुन खुंटयाने फिर्यादीचे उजवे हाताचे मनगटावर मारुन अश्लिल शब्दात बोलुन तिचे चारित्र्यावर संशय घेवुन फिर्यादीस व मुलीस जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२५,२९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**७) तीन चाकी डालाच्या धडकेत एक गंभिर जखमी . :–**

दिनांक ०९/१०/२०१७ चे १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कुमारी छबीया नासीर शेख वय १८ वर्ष, रा. उसगाव चांदोरी ही वडील नासीर गुलाब शेख वय ४८ वर्ष, यांचे सोबत होंन्डा ड्रिम मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ यु ८३३४ ने गावी मेन रोडने परत जात असतांनी यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन तीन चाकी डाला भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालुवन फिर्यादीचे वडीलांचे मोटार सायकलला धडक मारुन फिर्यादीचे वडीलास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३७७,३८८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लेंडे पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**८) अवैध दारू /जुगार अंडयावर धाडी . :–**

दिनांक ११/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, आंधळगाव, व भंडारा येथे अवैध दारू /जुगार अंडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून २० लिटर हातभट्टी किंमती १५,००/–रु, तसेच जुगारातुन २,४८७/रु कि. असा एकुण ३,९८७/रु चा माल जप्त करण्यात आला.

**(मपोउपनी. माया चाटसे)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.